## <u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.गवाणकर यांचे मार्फत.</u>**

०९. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे माझे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे आधार कार्ड, रेशन कार्ड व इतर ओळखपत्रे मुंबई येथील पत्त्यावरील आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, गावाकडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड व इतर ओळखपत्रे गावाकडील पत्त्यावरील असल्याबाबत मला यापूर्वी प्रस्तूत दाव्यात दाखल करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे शिक्षण मुंबई येथे झाले आहे. मी दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मठबुद्रुक येथे शिक्षण झालेले नाही. मी मठबुद्रुक येथे माझे शिक्षण झाले आहे ही बाब दर्शविण्यासाठी पुरावा सादर करु शकतो.

१०. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला समर्थन देण्यासाठी आज रोजी साक्ष देत आहे. वादी व माझ्या शपथपत्रातील मजकूर तंतोतंत का सारखा आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी व माझ्या शपथपत्रातील मजकूर तंतोतंत सारखा आहे.

**प्रश्न :** वादीचा उलटतपास ज्याप्रमाणे आहे त्याचप्रमाणे तुमचे उलटतपासाचे कामी म्हणणे आहे असे तुमचे म्हणणे आहे.(वादीच्या वकिलांनी अशा स्वरुपाचा प्रश्न विचारता येवू शकत नाही असा आक्षेप घेतला. याउलट प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद मांडला की, वरीलप्रमाणे प्रश्न का विचारता येवू शकत नाही याबाबत कुठलेही कारण दिले नाही. त्याचप्रमाणे साक्षीदारास वादीचा उलटतपास वाचण्यासाठी दिलेला आहे. सदरचा उलटतपास साक्षीदारास रेफर करुन त्याबाबत उत्तर देता येवू शकते. उभय पक्षांच्या अनुषंगाने नमुद करणे आवश्यक आहे की, साक्षीदाराचा सरतपास व उलटतपास स्वतंत्ररित्या नोंदविला जातो. त्याकरिता प्रतिपक्षास उलटतपासादरम्यान प्रश्न विचारण्याची पूर्णपणे मुभा आहे. उपरोक्तप्रमाणे विचारण्यात आलेला प्रश्न हा संदिग्ध स्वरुपाचा असल्याने वरील प्रश्न विचारण्याची परवानगी नाकारण्यात येते.)

११. मला बोटखत म्हणजे काय याबाबत माहिती नाही. मला बोटखतमध्ये नोंदी कोण घेत होते याबाबत माहिती नाही. याबाबत मला माहिती नाही की, बोटखतमध्ये कुठल्या सालापासून ते कुठल्या सालापर्यंत नोंदी घेतल्या जात होत्या. हे मला आठवत नाही की, बोटखतामध्ये एकूण किती रकाने असतात. हे मला सांगता येणार नाही की, मी शेवटचे बोटखत कधी पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की,मी प्रत्यक्षात बोटखत पाहिलेले नाही त्यामुळे मला वरील बाबी मला सांगता येत नाहीत. मी पाहिलेले बोटखत हजर करु शकतो. सदरचे बोटखत हे बाळा येशू भटकर यांच्या ताब्यामध्ये होते. मी पुढील तारखेस सदरचे बोटखत हजर करु शकतो.

(प्रतिवादीच्या विधीज्ञांनी बोटखत हजर केल्यानंतर पुढील उलटतपास घ्यावयाचा आहे असे सांगितल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करणेत येतो.)

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १६/१२/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण